| पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.<br>करआकारणी व करसंकलन विभाग | |
|---|---|
| आदेश स्वरुप | इलेक्ट्रीक वाहन धोरण-२०२१ |
| आदेश क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/ ०२ /२०२१, दिनांक ०३ / ०१ /२०२२ |
| विषय : | इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना / गृहनिर्माण संस्थांना त्यांच्या मालमत्ता करात सूट देण्याबाबत... |
| अंमलबजावणी कालावधी | स्थायी |
| कोणाच्या माहितीसाठी / कार्यवाहीसाठी | मिळकत कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | नगर विकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमयुएम-२०२१/प्र.क्र. १३४/नवि-१७ , दिनांक २० ऑगस्ट, २०२१ |

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील इमारती व जमिनीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १२७ व १२९ नुसार करआकारणी करणेत येते. तसेच अनुसुची ड प्रकरण ८ नियम ७ (१) अन्वये त्या-त्या आर्थिक वर्षातील प्रचलित प्रती चौरस फूट दराने मिळकतीचे करयोग्य मुल्य निश्चित करणेत येते.

इलेक्ट्रीक वाहनांकरीता चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या स्थानिक नागरी संस्थांतील नागरिकांना / गृहनिर्माण संस्थांना महाराष्ट्र इलेक्टीक वाहन धोरण-२०२१ नुसार मालमत्ता करात सूट देण्याबाबत संदर्भीय शासन निर्णय प्राप्त आहे. तद्नुषंगिक संबधित मिळकतधारकांना मालमत्ता करामध्ये सवलत देणेकरिता खालील नमूद प्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

१) स्वत:च्या इलेक्ट्रीक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन उभारल्यास व त्यातून इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास, मालमत्ता करात २% सूट देण्यात यावी. तथापि, रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता मालमत्ता धारकाने घ्यावी.

२) गृहनिर्माण संस्थांमध्ये सामायिक सुविधांतर्गत सदस्यांना इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास मालमत्ता करात ५% इतक्या कमाल मर्यादेपर्यंत सूट देण्यात यावी.

३) गृहनिर्माण संस्थांनी त्यांच्या मालकीच्या जागेत व्यापारी तत्वावर इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा, मुळ पार्किंग वगळता अन्य मोकळ्या जागेत केल्यास, मात्र त्यामुळे आपत्कालीन कामाकरिता ती जागा अडचणीची असू नये. सदर मोकळ्या जागेचा वापर व्यापारी कारणाकरिता होणार असला, तरी त्या जागेकरिता व्यापारी दराने मालमत्ता कराची आकारणी न करता, ती घरगुती दराने करावी.

४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये मिळकतधारकाने उपरोक्त मुद्दा क्रमांक १ नुसार ज्या ठिकाणी इलेक्ट्रीक वाहनाकरिता चार्जिंग स्टेशन द्वारे इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध करुन दिलेस अशा मिळकतधारकाकडून अर्जासोबत मिळकतींची मालकी हक्काची कागदपत्रे, चार्जिंग स्टेशन उभारलेचा फोटो, साधे बंधपत्र (स्वत:चे चार्जिंग स्टेशन मधून इतर इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध करुन देत असलेबाबत), मिळकतकर ना हरकत दाखला घेऊन तपासणीअंती मालमत्ता करामध्ये २ % सवलत देणेत यावी.

५) गृहनिर्माण संस्थांमध्ये सामायिक सुविधांतर्गत सदस्यांना इलेक्ट्रीक वाहन चार्जिंगची सुविधा उपलब्ध केल्यास अशा गृहनिर्माण संस्थेकडून अर्जासोबत मिळकतींची मालकी हक्काची कागदपत्रे, चार्जिंग स्टेशन उभारलेचा फोटो, सोसायटी मंजूर ठराव प्रत (चार्जिंग स्टेशन मधून सदस्यांना इलेक्ट्रीक वाहनधारकांना चार्जिंगची सुविधा उपलब्ध करुन देत असलेबाबत) मिळकतकर ना हरकत दाखला घेऊन तपासणीअंती मालमत्ता करामध्ये ५ % सवलत देणेत यावी.

कृपया मागे पहा....(२)

६) सदरची सवलत हि महाराष्ट्र इलेक्टीक वाहन धोरण-२०२१ लागू असेपर्यंत देय राहील.

उपरोक्त नमूद मालमत्ता करामध्ये द्यावयाच्या सवलतीची अंमलबजावणी आदेशाचे दिनांकापासून करणेत यावी.

(राजेश पाटील)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८.

प्रति :

१) सर्व करसंकलन विभागीय कार्यालय/गट प्रमुख/ गटलिपिक
२/- आवश्यक त्या कार्यवाहीकामी

प्रत :

१.सर्व क्षेत्रीय कार्यालये  २. लेखा विभाग  ३.मुलेप विभाग
४. माहिती तंत्रज्ञान विभाग / टेक नाईन सर्व्हीसेस प्रा.लि.